ePaper

**पृथ्वीवर येणार मोठं संकट; महाकालेश्वर मंदिरातून मिळाले संकेत?**

| वर्ष - 8 | अंक - 296 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

## आतील पानांत


- आयपीएल फायनलवर पावसाचं सावट!
- ६०० कोटींची संपत्तीही नाकारली
- मोबाइलवर सरकारचं नियंत्रण
- ‘बकऱ्याच्या आकाराचा केक कापा’


www.mahaenews.com | मंगळवार, दि. 3 जून 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## युक्रेनच्या भीषण हल्ल्यात रशियाच्या 41 फायटर विमानांचा कोळसा; एका विमानाची किंमत 3000 कोटी!

# रशिया-युक्रेन मध्ये अणूयुद्ध ?

## रशियामध्ये 4000 किलोमीटर आत घुसून हल्ला : दोन्ही देश सूडाने पेटलेले !

| मॉस्को / नवी दिल्ली | प्रतिनिधी | महाईन्यूज

**रशिया आणि युक्रेन यांच्यामधील युद्ध काही संपण्याचे नाव घेत नाही. रशियाचे राष्ट्राध्यक्ष ब्लादिमीर पुतिन आणि युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की हे दोघेही सूडाने पेटले असून युद्धाचा शेवट हा अणुबॉम्बनेच होणार, असे मत आता जागतिक संरक्षण तज्ज्ञांनी मांडले आहे. दरम्यान, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मध्यस्थीचा प्रयत्न केला, पण दोन्ही राष्ट्राध्यक्षांनी त्यांची खिल्ली उडवली आहे.**



### युक्रेनचा सर्वात मोठा हल्ला

युक्रेनने रविवारी रात्री रशियावर आत्तापर्यंतचा सर्वात मोठा हल्ला चढवला. यामध्ये रशियाचे प्रचंड नुकसान झाले असून युक्रेनच्या आत्मघाती ड्रोन्सनी रशियाच्या वायुदलाची ४१ लढाऊ विमाने नष्ट केली, किंबहुना त्यांचा कोळसा केला. यातील एका विमानाची किंमत साधारण तीन हजार कोटी रुपये असल्याचे रशियाच्या प्रवक्त्यांनी सांगितले आहे.



### युक्रेनने नाव दिले ‘ऑपरेशन वेब’!

युक्रेनच्या लष्कराने हाती घेतलेल्या या ‘ऑपरेशन वेब’ मध्ये रशियाच्या अतिमहागड्या विमानांचा कोळसा झाला आहे, एका विमानाची किंमत अंदाजे तीन हजार कोटी सांगितली जात आहे.

### 4000 हजार किलोमीटर आत घुसले !

या हल्ल्यात युक्रेनच्या गुप्तहेर खात्याने अतिशय महत्त्वाची भूमिका बजावली. सुमारे चार हजार किलोमीटर आतमध्ये घुसून हा हल्ला करण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### रशिया-युक्रेन युद्ध निर्णायक टप्प्यावर..

गेल्या काही महिन्यांपासून रशिया आणि युक्रेन यांच्यात सुरु असलेल्या युद्धात रविवारी एक निर्णायक घटना घडली. हे युद्ध आता निर्णायक टप्प्यावर आले आहे. युक्रेनकडून रशियन सैन्याच्या प्रमुख हवाई तळांवर ड्रोन्सनी हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात रशियाचे अतोनात नुकसान झाले आहे. युक्रेनच्या आत्मघाती ड्रोन्सनी रशियाच्या वायूदलाची तब्बल ४१ लढाऊ विमाने नष्ट केली आहेत. या हल्ल्यात रशियाची अणवस्त्र वाहून नेण्याची क्षमता असलेली सर्व विमाने नष्ट झाल्याचा दावा युक्रेनकडून केला जात आहे. त्यामुळे सूडाने पेटलेला रशियासुद्धा अणुयुद्ध करण्याच्या मन:स्थितीत आला आहे आणि युक्रेननेसुद्धा तशा प्रकारची जुळवाजुळव केली आहे.

### रशियाची अपरिमित हानी

या ड्रोनच्या हल्ल्यात रशियाची टीयू-९५, टीयू-२२ सारखी बॉम्बर्स विमाने आणि ए-५० ही महागडी हेर विमाने नष्ट झाली आहेत. रशियाकडे फक्त दहा ए-५० विमाने होती. मात्र, युक्रेनच्या या भयावह हल्ल्यात यापैकी काही विमाने नष्ट झाली आहेत. या प्रचंड हानीमुळे रशियन वायूदलाचे कंबरडे मोडल्याचे सांगितले जात आहे.

### युक्रेनचे दीड वर्षाचे प्लॅनिंग यशस्वी : लेन्स्की

या भीषण आणि भयानक हल्ल्याचे समर्थन युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की यांनी केले आहे. आमच्या ११७ ड्रोन्सनी रशियाची ४१ लढाऊ विमाने केवळ उद्ध्वस्त केली नसून त्यांचा कोळसा केला आहे आणि यासाठी आम्ही दीड वर्षे प्लॅनिंग करत आहोत, असे झेलेन्स्की म्हणाले. याचबरोबर रशियाचे पाच हवाई तळही उद्ध्वस्त केल्याचे त्यांनी सांगितले. यासाठी आमच्या ड्रोन्सचा खर्च केवळ ८.५ लाख डॉलर्स असून रशियाचे मात्र ७०० कोटी डॉलर्सचे नुकसान झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यांची ही विमाने बेचिराख झाली असून त्याचा लाईव्ह व्हीडिओ देखील रशियाला पोहोच झाला असल्याचे त्यांनी सांगितले.

### युक्रेनचे खास ड्रोन्स

युक्रेनने ड्रोन हल्ल्याच्या मोहिमेला ‘ऑपरेशन वेब’ असे नाव दिले होते. या हल्ल्यासाठी युक्रेनने ‘फर्स्ट पर्सन व्ह्यू ड्रोन’ चा वापर केला. युक्रेन गेल्या दीड वर्षांपासून या हल्ल्याची योजना आखत होता. त्यासाठी सीमारेषेपासून तब्बल चार हजार किलोमीटर आतमध्ये तब्बल ४० ट्रक्समधून ११७ ड्रोन्स छताच्या लाकडी भागात लपवून रशियन सैन्याच्या हवाई तळापर्यंत नेण्यात आली. हे ट्रक्स रशियाच्या हवाई तळापर्यंत पोहचल्यानंतर ट्रकचे केबिन्स रिमोटने उघडण्यात आले. यामधून बाहेर पडलेल्या ड्रोन विमानांनी रशियाच्या इर्कुत्सक, इव्हानोव्हा,

# शहरातील रुग्णालयांचे फायर ऑडिट करणार!

## महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांची माहिती

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सर्वसामान्य नागरिक केंद्रबिंदू ठेवून त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी आपला प्रयत्न राहणार आहे. शहरातील रुग्णालयांमध्ये उपचारांसाठी जाणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी शहरातील महापालिकेच्या रुग्णालयांसह खासगी रुग्णालयांचे फायर ऑडिट करण्याचे आदेश संबंधित विभागांना दिले आहेत.**



अशी माहिती महापालिकेचे नवनियुक्त आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली. महापालिकेच्या आयुक्तपदाची जबाबदारी घेतल्यानंतर नवल किशोर राम यांनी सोमवारी महापालिकेतील विविध खात्यांचा आढावा घेतला. या वेळी विभागप्रमुखांनी त्यांच्यासमोर सादरीकरण केले. पुढील दोन दिवस हा आढावा घेतला जाणार आहे.महापालिका आयुक्त म्हणाले, 'रुग्णालयांमध्ये आवश्यक ती खबरदारी घेतली जात नसल्याने आग लागणे, अपघात होण्याचे प्रकार घडतात. या पार्श्वभूमीवर खासगी रुग्णालयांनी आवश्यक नियमांचे पालन करून सुरक्षिततेच्या दृष्टिने त्याची पूर्तता केली आहे का? याची तपासणी होणे गरजेचे आहे. यासाठी शंभर टक्के फायर ऑडिट करण्याचे आदेश दिले आहेत. ज्या रुग्णालयांमध्ये नियमांची पूर्तता होत नाही, हे समोर येईल, त्यांना टाळे ठोकण्याचा इशाराही देण्यात आला आहे.'"दैनंदिन कामात न अडकता शहराच्या आणि नागरिकांच्या हितासाठी महत्त्वपूर्ण ठरतील,

अशा योजना सुरू करण्यावर आपला भर राहणार आहे. केवळ महापालिकेतील अधिकाऱ्यांकडून मिळणाऱ्या माहितीवर अवलंबून न राहता वेगवेगळ्या माध्यमांतून माहिती घेऊन नागरिकांच्या फायद्यासाठी उपक्रम राबविले जाणार आहेत. नागरिकांकडून तसेच विविध घटकांकडून माहिती घेत कामाचा प्राधान्यक्रम ठरविला जाणार आहे. प्रसंगी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी भेट देण्यावर भर राहील,' असे त्यांनी सांगितले.'शहरात नदीसुधारणा योजनेचे काम गेले अनेक वर्षे सुरू आहे. ही शहरासाठी महत्त्वपूर्ण योजना असून, त्याचे काम संथ गतीने सुरू आहे. याबरोबर सक्षम सार्वजनिक वाहतुकीमध्ये

### मेट्रो, जायका प्रकल्पांना प्राधान्य'

"दैनंदिन कामात न अडकता शहराच्या आणि नागरिकांच्या हितासाठी महत्त्वपूर्ण ठरतील, अशा योजना सुरू करण्यावर आपला भर राहणार आहे. केवळ महापालिकेतील अधिकाऱ्यांकडून मिळणाऱ्या माहितीवर अवलंबून न राहता वेगवेगळ्या माध्यमांतून माहिती घेऊन नागरिकांच्या फायद्यासाठी उपक्रम राबविले जाणार आहेत. नागरिकांकडून तसेच विविध घटकांकडून माहिती घेत कामाचा प्राधान्यक्रम ठरविला जाणार आहे.

मेट्रो प्रकल्पासह घनकचरा व्यवस्थापनाकडे विशेष लक्ष दिले जाणार आहे. या योजनांतून नागरिकांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारणार असल्याने या प्रकल्पांची कामे प्राधान्याने मार्गी लावण्याचा प्रयत्न आहे,' असे आयुक्तांनी स्पष्ट केले.

अशी माहिती महापालिकेचे नवनियुक्त आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली. महापालिकेच्या आयुक्तपदाची जबाबदारी घेतल्यानंतर नवल किशोर राम यांनी सोमवारी महापालिकेतील विविध खात्यांचा आढावा घेतला. या वेळी विभागप्रमुखांनी त्यांच्यासमोर सादरीकरण केले. पुढील दोन दिवस हा आढावा घेतला जाणार आहे.महापालिका आयुक्त म्हणाले, 'रुग्णालयांमध्ये आवश्यक ती खबरदारी घेतली जात नसल्याने आग लागणे, अपघात होण्याचे प्रकार घडतात. या पार्श्वभूमीवर खासगी रुग्णालयांनी आवश्यक नियमांचे पालन करून सुरक्षिततेच्या दृष्टिने त्याची पूर्तता केली आहे का? याची तपासणी होणे गरजेचे आहे. यासाठी शंभर टक्के फायर ऑडिट करण्याचे आदेश दिले आहेत. ज्या रुग्णालयांमध्ये नियमांची पूर्तता होत नाही, हे समोर येईल, त्यांना टाळे ठोकण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनांची तपासणी

## वाहतूक करणाऱ्या वाहनधारकांच्या वाहनांची योग्यता तपासणी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नवीन शैक्षणिक वर्षानुसार शाळांना लवकरच सुरुवात होणार आहे. तत्पूर्वी शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनधारकांच्या वाहनांची योग्यता तपासणी करण्यात येणार आहे. उपप्रादेशिक परिवहन विभागाने (आरटीओ) योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरण करण्याबाबत सोमवारी आदेश काढले असून, सुट्टीच्या दिवशीदेखील तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे.**




शालेय विद्यार्थ्यांसाठी शाळा प्रशासनाने तसेच खासगी वाहनधारकांकडून सेवा दिली जाते. विद्यार्थ्यांची सुरक्षित व्हावी म्हणून शालेय बस, व्हॅन या वाहनांची तपासणी करून योग्यता प्रमाणपत्र अद्ययावत असणे बंधनकारक आहे. त्यासाठी सर्व सरकारी, खासगी शाळा, महाविद्यालय, शैक्षणिक आस्थापनातील वाहनांची तातडीने तपासणी करावी. त्यासाठी 'आरटीओ'कडून संबंधित वाहनधारकांना दिवे येथील कार्यालयात कागदपत्र सादर करून योग्यता प्रमाणपत्र अद्ययावत करावे, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्नील भोसले यांनी केले, तर शालेय वाहतूक करणाऱ्या वाहनांसाठी दिवे (ता. पुरंदर) येथील कार्यालय सुट्टीच्या दिवशीही सुरू ठेवण्यात येणार असल्याची माहिती भोसले यांनी दिली.शालेय विद्यार्थ्यांसाठी शाळा प्रशासनाने तसेच खासगी वाहनधारकांकडून सेवा दिली जाते. विद्यार्थ्यांची सुरक्षित व्हावी म्हणून शालेय बस, व्हॅन या वाहनांची तपासणी करून योग्यता प्रमाणपत्र अद्ययावत असणे बंधनकारक आहे. त्यासाठी सर्व सरकारी, खासगी शाळा, महाविद्यालय, शैक्षणिक आस्थापनातील वाहनांची तातडीने तपासणी करावी. त्यासाठी 'आरटीओ'कडून संबंधित वाहनधारकांना दिवे येथील कार्यालयात कागदपत्र

### योग्यता प्रमाणपत्र अद्ययावत करावे

आरटीओ'कडून संबंधित वाहनधारकांना दिवे येथील कार्यालयात कागदपत्र सादर करून योग्यता प्रमाणपत्र अद्ययावत करावे, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्नील भोसले यांनी केले, तर शालेय वाहतूक करणाऱ्या वाहनांसाठी दिवे (ता. पुरंदर) येथील कार्यालय सुट्टीच्या दिवशीही सुरू ठेवण्यात येणार असल्याची माहिती भोसले यांनी दिली.

सादर करून योग्यता प्रमाणपत्र अद्ययावत करावे, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्नील भोसले यांनी केले, तर शालेय वाहतूक करणाऱ्या वाहनांसाठी दिवे (ता. पुरंदर) येथील कार्यालय सुट्टीच्या दिवशीही सुरू ठेवण्यात येणार असल्याची माहिती भोसले यांनी दिली.नवीन शैक्षणिक वर्षानुसार शाळांना लवकरच सुरुवात होणार आहे. तत्पूर्वी शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनधारकांच्या वाहनांची योग्यता तपासणी करण्यात येणार आहे. उपप्रादेशिक परिवहन विभागाने (आरटीओ) योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरण करण्याबाबत सोमवारी आदेश काढले असून, सुट्टीच्या दिवशीदेखील तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे. शालेय विद्यार्थ्यांसाठी शाळा प्रशासनाने तसेच खासगी वाहनधारकांकडून सेवा दिली जाते.शालेय बस, व्हॅन या वाहनांची तपासणी करून योग्यता प्रमाणपत्र अद्ययावत असणे बंधनकारक आहे.

# "कॉफी विथ कमिशनर"!

## थेरगाव आणि भोसरी शिलाई केंद्रातील महिलांनी साधला आयुक्तांशी संवाद

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने राबवण्यात येणाऱ्या 'कॉफी विथ कमिशनर' या उपक्रमात महापालिकेने महिला सबलीकरणासाठी सुरू केलेल्या थेरगाव आणि भोसरी शिलाई केंद्रातील महिला आज सहभागी झाल्या होत्या. या दोन्ही केंद्रातील महिलांनी आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्याशी संवाद साधला.**



कोरोना महामारीमध्ये विधवा झालेल्या महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी तसेच त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी महापालिकेने थेरगाव येथे शिलाई केंद्र सुरू केले आहे. तसेच भोसरी येथे महिला सबलीकरणाच्या उद्देशाने केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्रातील महिलांना थेट आयुक्त शेखर सिंह यांच्याशी संवाद साधण्याची संधी मिळाली. यावेळी उपायुक्त ममता शिंदे, सहाय्यक समाजविकास अधिकारी संतोषी चौरगे, समुह संघटक वैशाली खरात, जयश्री पवळे, भोसरी शिलाई केंद्रातील रुपाली जोशी, शितल दरंदले, चैतन्या सावंत, सुषमा कडदेकर, रसमिता भोई, राणी शेळके, जयश्री कांबळे, मानसी कांबळे, अमृता काळे, स्वप्ना आढारी, थेरगाव शिलाई केंद्रातील स्मिता अंकुशे, मंगल लोंढे, सीमा चौधरी, सविता शिंदे, सत्यभामा उदमले, मीना चौधरी आदी उपस्थित होत्या.

आयुक्त सिंह यांनी सुरुवातीला महिलांना भोसरी व थेरगाव येथील केंद्रामध्ये काम करताना काही अडचणी येतात का, याबाबत माहिती घेतली. महिला सबलीकरणासाठी महापालिका विविध उपाययोजना राबवत आहे. आगामी काळात थेरगाव, भोसरी सारख्या केंद्रांना नियमित काम मिळावे, यासाठी विविध उपक्रम राबवण्याचे नियोजन आहे. ज्यामध्ये विविध संस्था, कंपन्यांचे गणवेश तयार करण्याचा देखील समावेश आहे. यासाठी आवश्यक प्रशिक्षण महिलांना देण्याचे नियोजन आहे, असे आयुक्त सिंह यांनी सांगितले. यावेळी नवी दिशा उपक्रमामध्ये भविष्यातील संधी, आव्हाने आणि अनुभवांबद्दल आयुक्त शेखर सिंह यांच्यासमवेत महिलांची सविस्तर चर्चा झाली.

> कोरोना महामारीनंतर रोजगार नसल्याने आम्ही खचून गेलो होतो. पण महापालिकेच्या थेरगाव येथील प्रशिक्षण केंद्रामुळे आम्हाला खूप आधार मिळाला. आज आयुक्त यांची भेट घेतल्याने आम्हाला प्रत्यक्ष समस्या, अभिप्राय आणि सूचना त्यांच्यासमोर मांडण्याची संधी मिळाली. आमच्या सूचनांवर नक्कीच विचार केला जाईल, याची खात्री आहे.
> **-मीना चौधरी,** थेरगाव शिलाई केंद्र

> महापालिका प्रशासनाच्या पाठिंबामुळे आम्हाला उत्साहाने काम करण्यास ऊर्जा मिळत आहे. आज आयुक्त शेखर सिंह यांच्यासोबत चर्चा करण्याची संधी मिळाली. महिला सबलीकरणासाठी महापालिकेचे असणारे भविष्यातील नियोजन पाहून यापुढेही आमच्या पाठिशी उभी असल्याची खात्री पटली आहे.
> **-स्मिता अंकुशे,** भोसरी शिलाई केंद्र

---

# पैशांसाठी पती, सासू, दिर, मावस सासू, सासऱ्याकडून मारहाण

## मारहाणीचे पुरावे असलेला मोबाइल संच हिसकावला; महिला आयोगाकडून तक्रारीची दखल नाही

### ऐश्वर्या हुलावळे हिचा आरोप

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड : वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरण ताजे असतानाच लग्नात मोटार, १५ तोळे सोने, तसेच इतर महागड्या वस्तू देऊनही पैशांसाठी पती, सासू, दिर, मावस सासू, सासऱ्यांनी छळ केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. काठी, बेल्ट, हाताने मारहाण केल्याचा आरोप ऐश्वर्या आदित्य हुलावळे यांनी सोमवारी (दि. २) चिंचवड येथे पत्रकार परिषदेत केला. मारहाणीचे पुरावे असलेला मोबाइल हिसकावला, गुन्हे मागे घेण्यासाठी धमकी दिली जात आहे. दोन महिन्यांपूर्वी महिला आयोगाकडे तक्रार देऊनही त्याची दखल घेतली नसल्याचा आरोपही ऐश्वर्या यांनी केला. यावेळी ऐश्वर्या यांचे आई-वडील उपस्थित होते.**



> "या प्रकरणात हिंजवडीतील गुन्ह्याचा तपास झाला आहे. आरोपपत्र दाखल केले. आहे. प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे."
> **-विशाल गायकवाड** (पोलीस उपायुक्त)


ऐश्वर्या हुलावळे म्हणाल्या, आदित्य हुलावळे यांच्याशी २८ फेब्रुवारी २०१७ रोजी भोसरीत लग्न झाले. सासरकडच्यांनी लग्नात मागणी केल्याप्रमाणे एक चारचाकी वाहन, १५ तोळे सोन्याचे दागिने व अन्य सुख सुविधेच्या सर्व वस्तू दिल्या गेल्या. वडील ८१ टक्के अपंग असतानाही त्यांनी जमीन विकून वस्तू दिल्या. लग्नाच्या दोन महिन्यांनंतर माहेराहून पैसे आणण्यासाठी पती, सासू, दीर, आजोबा, मावस सासू, मावस सासरे यांनी छळ करण्यास सुरवात केली. पतीचे बाहेरील अनैतिक संबंध कळल्यावर तक्रार केली असता सासरच्यांनी मारहाण केली. तसेच, माहेराहून पाच लाख रुपये घेऊन आल्यास नांदवू, अन्यथा घरातून निघून जा, अशी धमकी दिली. मारहाण केली. वारंवार होत असलेले अत्याचार, शिवीगाळ, धमक्या देत असल्याने डिसेंबर २०१७ रोजी हिंजवडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. यावेळी पोलीस ठाण्यातही सासरच्याकडून तू जर तक्रार दाखल केली, तर आम्ही तुला नांदवणार नाही, अशी धमकी दिली गेली.

भाजीमध्ये उंदीर मारण्याचे औषध दिल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला. यासंदर्भात पुणे पोलीस आयुक्त कार्यालयात जाऊन ५ जानेवारी आणि १५ जानेवारी २०१८ रोजी पुन्हा तक्रार अर्ज दिला. यावेळी दोन्ही कुटुंबाला एकत्रित बोलावून एकमेकांची समजूत काढून मिटवून घेण्यास सांगितले गेले. मात्र, यावेळी देखील प्रकरण मिटले नाही. त्यानंतर पुन्हा ३ मार्च २०१८ रोजी हिंजवडी पोलीस ठाण्यामध्ये तक्रार अर्ज दाखल केला. मात्र, पोलिसांकडून तक्रारीची दखल घेतली गेली नाही. अखेर २४ डिसेंबर २०१८ रोजी हिंजवडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर सप्टेंबर २०१८ मध्ये पतीकडून घटस्फोटाबाबत पत्र देण्यात आले आहे. तक्रार मागे घेण्यासाठी धमकी दिली जात असल्याचा आरोपही ऐश्वर्या यांनी केला.

### महिला आयोगाकडूनही दखल नाही

पिंपळे-सौदागर येथील सासरच्या कार्यक्रमासाठी २४ मार्च २०२५ रोजी मी आली असता मला मारहाण करण्यात आली. माझा मोबाईलही हिसकावून घेतला. भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांचे बंधू भरत काटे यांच्यासह २० ते २५ जणांनी मारहाण, शिवीगाळ करीत धक्के देऊन मला बाहेर काढले. याबाबत सांगवी पोलीसांनी केवळ तक्रार अर्ज घेतला. गुन्हा दाखल केला नाही, याबाबतचे पत्र राज्य महिला आयोगाला व्हॉटसअॅपवर पाठवले होते. अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या स्वीय सहायकाच्या संपर्कात होते. त्यांनी वेगवेगळी कारणे सांगून तक्रारीकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप ऐश्वर्या यांनी केला.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### भगवंतावर अकारण प्रेम करावे.

खरोखर, जगात आणि लौकिकात आपण अडाणी राहिलो तर काही वाईट नाही. भगवंताच्या मार्गामध्ये त्याचा फायदाच होईल. आपण अडाणी झाल्याशिवाय, म्हणजे आपली विद्या आणि मोठेपण विसरल्याशिवाय, परमार्थ साधत नाही. मुलगा गावाला जाताना ज्याप्रमाणे आई त्याला फराळाचे देते, त्याप्रमाणे परमात्मा आपल्याला ज्या परिस्थितीत जन्माला घालतो त्या परिस्थितीत राहण्यासाठी लागणारे समाधानही तो आपल्याला देत असतो. ते घ्यायची आपली लायकी मात्र पाहिजे. जिथे असमाधान फार, तिथे दुष्ट शक्तींना काम करायला वाव मिळतो. याच्या उलट, जिथे खरे समाधान आहे, तिथे चांगल्या शक्ती मदत करतात. आपण नामाला चिकटून राहिलो तर बाहेरची वाईट परिस्थिती बाधणार नाही. देहाचा मनाशी संबंध आहे, आणि मनाचा हृदयाशी संबंध आहे; म्हणून मन नेहमी अगदी समाधानात ठेवावे, म्हणजे प्रकृती चांगली राहून आयुष्य वाढेल.

स्वार्थ सुटताना पहिल्या-पहिल्याने मनुष्य व्यवहाराच्या चौकटीत बसणार नाही. जो येईल त्याला तो आपलाच म्हणेल. पण परमार्थ मुरला की तो व्यवहार बरोबर करून शिवाय नि:स्वार्थी राहील. खरोखर, परमार्थ हे एक शास्त्र आहे; त्यामध्ये सुसूत्रपणा आहे. व्यवहार न सोडावा; पण विषयाकडे गुंतणारी आपली वृत्ती भगवंताच्या आड येते, म्हणून तिला भगवंताकडे गुंतवावे. भगवंताची खरी आवड उत्पन्न झाली पाहिजे. भगवंतावर अकारण प्रेम करणे याचे नाव परमार्थ. परमार्थाला डोके शांत पाहिजे. एका गृहस्थाला सगळीकडे रामाची मूर्ती दिसू लागली. झाले ! त्याला वाटले की देव आपल्याला भेटला. पण हे काही खरे भगवंताचे दर्शन नव्हे. तो सर्व ठिकाणी आहे अशी भावना झाली पाहिजे. परमार्थाची काळजी करू नये; ती काळजीच प्रगतीच्या आड येते. वय वाढू लागले की आपले सर्व अवयव जसे प्रमाणात आपोआप वाढतात, तसेच परमार्थाला लागणाऱ्या गुणांचे आहे. आपण साधन करीत असताना, आपली प्रगती किती झाली हे सारखे पाहू नये. समजा, आपण आपल्या परसात एक झाड लावले, आणि ते किती वाढले हे पाहण्यासाठी रोज त्याच्या मुळ्या उपटून आपण जर पाहू लागलो, तर ते झाड वाढेल का ? अगदी तसेच परमार्थाच्या प्रगतीचे आहे. मनुष्याला परमार्थ किती साधला हे त्याच्या बोलण्यावरून आणि दृष्टीवरून ओळखता येते.

बोधवचन:- परमार्थ हा लोकांना उपदेश करण्यासाठी नाही. तो निव्वळ स्वतःकरिता आहे.



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# ओवैसी यांच्या यॉर्करवर पाकिस्तान क्लीन बोल्ड!



**'ऑपरेशन सिंदूर' नंतर भारताची बाजू विविध देशांना पटवून देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने सर्वपक्षीय प्रतिनिधी मंडळे पाठवण्याचा निर्णय घेतला. यामध्ये सर्वपक्षीय खासदार, काही ज्येष्ठ नेते, काही निवृत्त राजनैतिक अधिकारी असलेली ही प्रतिनिधी मंडळे संपूर्ण जगभर सध्या भारताची भूमिका कशी योग्य आहे? आणि दहशतवादाला पोसणारा पाकिस्तान कसा खोटारडा आहे हे समजावून सांगत आहेत !**

### केंद्र सरकारची 'डोकॅलिटी' !

सदस्यांची निवड करताना केंद्र सरकारने अत्यंत 'डोकेबाजपणे' व्यूहरचना केली आहे. त्यात सर्व सदस्यांचा पूर्वानुभव, राजकीय अनुभव, वक्तृत्वकला, परिपक्वपणा आणि सर्वात शेवटी यातून भारताच्या अंतर्गत राजकारणावर पडणारा प्रभाव याचा अगदी बारकाईने विचार केलेला आहे. या सर्वांमध्ये अगदी पटकन नजरेस भरणारी निवड आहे ती 'एमआयएम' चे नेते असदुद्दीन ओवैसी यांची! ओवैसी हे हैदराबादमधून निवडून आलेले त्यांच्या पक्षाचे एकमेव खासदार आहेत. त्यांची संसदेतील आणि बाहेरील जातीय विष पेरणारी भाषणे, त्यांची नेहमीची 'धर्मांध' भूमिका यामुळे ते नेहमीच भाजपा विरोधी मानले जातात. वक्फ बोर्ड सुधारणा कायद्याविरोधात त्यांनी घेतलेली टोकाची भूमिका, हे त्याचे ताजे उदाहरण आहे. पण, आता जादूची काठी फिरली आहे. इतर राष्ट्रांमध्ये भारताची भूमिका मांडताना ओवैसी यांनी टाकलेल्या यॉर्करवर पाकडे क्लीन बोल्ड होत आहेत.

### इस्लामी राष्ट्रांमध्ये ओवैसींचा बोलबाला..

पहलगाममध्ये पाक पुरस्कृत भ्याड दहशतवाद्यांनी 'धर्म' विचारून हिंदू पर्यटकांची हत्या केल्यावर ओवैसी यांच्यामधील 'राष्ट्रधर्म' अचानक जागृत झाला आणि त्यांनी पाकवर टीकेचे आसूड ओढण्यास सुरुवात केली, हे संपूर्ण जग पाहत आहे. केंद्र सरकारने ओवैसींमधील जागृत झालेले 'राष्ट्रभक्तीचे स्फुल्लिंग' अचूक हेरले आणि त्यांची परदेशी जाणाऱ्या मंडळामध्ये अचूक निवड केली. बरं त्यांना कुठे पाठवले, तर मुख्यत: इस्लामी देशांमध्ये! ओवैसींनी सुद्धा त्यांच्याकडून अपेक्षित असलेली भूमिका उत्तमपणे वठविली यात मुळीच वाद नाही. पण, म्हणून ओवैसी हे भाजपाला अपेक्षित असलेले हिंदुत्ववादी झाले का? असे होणे मुळात शक्य वाटत नाही.

### तथाकथित धर्मनिरपेक्ष पक्षांचा विरोधच..

भारतात परतल्यावर, ओवैसी पुन्हा एकदा आपल्या मूळ पदावर जातील हे निश्चित ! वक्फ सुधारणा विरोधात ते देशभर रान उठवतीलच, तसेच संसदेतही त्यांची आगपाखड चालूच राहील.. मोदी सरकारला नको नको करून सोडतील! पण, फरक एवढाच होईल, की यापूर्वी त्यांना भाजपाकडूनच फक्त विरोध होत असे, तो आता काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, जनता दल, समाजवादी, उबाठा गट, द्रमुक तसेच तथाकथित धर्मनिरपेक्ष पक्ष्यांच्या मित्रांकडून अधिक होईल, हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

### भाजपाची 'ए' टीम होणार?

दुसरे म्हणजे ओवैसी यांनी जी 'राष्ट्रवादी' भूमिका घेतली, ती अत्यंत धोरणीपणाने.. आपली ओळख केवळ 'मुस्लिम नेता' अशी न राहता, 'राष्ट्रवादी मुस्लिम नेता' अशी निर्माण करण्यात ते कमालीचे यशस्वी झाले आहेत. या प्रतिमेचा फायदा घेत, आपल्या 'धार्मिक' राजकारणाला उदारमतवादी मुस्लिमेतर जनतेचा पाठिंबा मिळवून आपला पाया अधिक विस्तृत करून शेवटी देशातील मुस्लिमांचा एकमेव नेता होण्याचे त्यांचे उद्दिष्ट आहे. त्यामुळेच इतर निधर्मी पक्षांचा त्यांना असलेला विरोध वाढत जाईल, कारण या पक्षांची व्होट बँक ओवैसी यांच्याकडे वळू शकते. आतापर्यंत हे पक्ष ओवैसी यांना भाजपाची 'बी' टीम म्हणत होते. आता, ओवैसी यांचे 'प्रमोशन' होऊन त्यांच्या पक्षाला भाजपाची 'ए' टीम म्हटले जाईल, हे सुद्धा लक्षात घ्यायला हवे!

### ममतादीदी जाळ्यात अडकल्या !

केंद्र सरकारचा दुसरा 'मास्टरस्ट्रोक' होता, तो तृणमूल काँग्रेसच्या युसूफ पठाणची केलेली निवड. युसूफ पठाण एक तर मूळ गुजराती, तो बंगाली नाही. तो 'टी एम सी' मध्ये देखील उपरा आहे. ममता बॅनर्जी यांचे 'अल्पसंख्यांक' प्रेम जगजाहीर आहे, त्यांना युसूफ पठाणची निवड मान्य झाली नाही आणि त्यांनी त्याच्या जागी आपला 'तथाकथित' भाचा अभिषेक बॅनर्जी याची निवड केली. यातून ममतादीदींचे'मुस्लिम प्रेम' बेगडी आहे आणि त्या परिवारवादी आहेत, हे सिद्ध करण्यात भाजप यशस्वी झाला. थोडक्यात, भाजपाने टाकलेल्या जाळ्यात ममतादीदी अडकल्या !

### काँग्रेस भोवती फेकले जाळे..

या प्रतिनिधी मंडळाच्या निमित्ताने मोदींनी काँग्रेसला चांगलेच खिंडीत गाठले. शशी थरूर यांनी ज्या प्रकारे भाजपा सरकारच्या समर्थनार्थ दंड थोपटले आहेत आणि ज्या हिरीरीने ते भारत सरकारची भूमिका लावून धरत आहेत त्यामुळे थरूर यांनी राहुल गांधींना प्रसिद्धीपासून झाकोळून टाकले आहे. केंद्र सरकारने थरूर, मनीष तिवारी, सलमान खुर्शीद या काँग्रेसी नेत्यांना सामावून घेतले, ते काँग्रेसला न विचारता..आता हे सर्व काँग्रेस नेते अंतरराष्ट्रीय पातळीवर आपल्या पक्षाच्या भूमिकेच्या विरोधात जाऊन भारत सरकारची बाजू मांडत आहेत. हीच काँग्रेसला मोठी चपराक आहे.

### काँग्रेसला शशी थरूर यांची ॲलर्जी..

काँग्रेस शशी थरूर यांच्यावर तुटून पडली आहे. पण त्यांना पक्षातून काढून टाकण्याची हिंमत होत नाही. थरूर यांना पक्षातून काढले तरी त्यांचे संसद सदस्यत्व कायम राहील. पण, काँग्रेसचे लोकसभेतील संख्याबळ मात्र एकाने घटेल. थरूर यांना हे पूर्ण माहीत आहे. त्यामुळे तेही आपणहून काँग्रेसचा राजीनामा देऊन स्वतःची खासदारकी गमावण्याचा वेडेपणा करणार नाहीत. काँग्रेसमध्येच राहून ते काँग्रेसच्या धोरणाविरोधात वागतील, असे दिसते. काँग्रेसच्या दृष्टीने ते 'अस्तनीतील निखारा' ठरतील. केरळची पुढील वर्षी होणारी विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून भाजपाने थरूर यांना हाताशी धरले आहे.

### काँग्रेसची संभ्रमावस्था..

काँग्रेसने समजा थरूर यांच्यावर कारवाई करण्याची हिंमत काँग्रेसने केली, तर मग बाकी तिवारी, खुर्शीद, शर्मा, अमरसिंग यांच्याबद्दलही तशीच भूमिका घेण्यासाठी काँग्रेसवरील दबाव वाढत जाईल. थोडक्यात थरूर यांनी काँग्रेसची अवस्था 'धरलं तर चावतं आणि सोडलं तर पळतं' अशी करून सोडली आहे, हे सूज्ञ राजकारण्यांच्या लक्षात आलेही असेल !

### शरद पवार यांच्या दुखण्यावर इलाज..

राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुप्रिया सुळेना एका प्रतिनिधी मंडळाचे नेतृत्व देऊन मोदींनी शरद पवार यांच्या दुखण्यावर इलाज केला आहे. आता शरद पवार यांना कुंपणावर बसण्याची भूमिका अधिकृतपणे घेण्याची सोय झाली आहे. द्रमुकच्या कानिमोझी यांनाही हे एका प्रतिनिधी मंडळाचे नेतृत्व देऊन स्टॅलिनला इशारा दिला आहे.

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार का?

## ‘घरातील कार्यक्रम असेल तर आम्ही एकत्र येतोच’

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या काही दिवसांपासून शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र येण्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहेत. या चर्चामागील कारण म्हणजे मागील काही दिवसांत शरद पवार आणि अजित पवार अनेकवेळा एकाच व्यासपीठावर आल्याचं पाहायला मिळालं. त्यानंतर आता पुन्हा एकदा शरद पवार आणि अजित पवार हे पुण्यातील साखर संकुलातील बैठकीत एकत्र आल्याचं पाहायला मिळालं. यावेळी शरद पवार, अजित पवार आणि जयंत पाटील यांच्यामध्ये बंद दाराआड चर्चा झाल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे.**



दरम्यान, या पार्श्वभूमीवर आता खुद्द अजित पवार यांनीच दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार का? यावर प्रतिक्रिया दिली आहे. गेल्या काही दिवसांपासून दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याच्या चर्चांच्या संदर्भात अजित पवार यांना माध्यमांच्या प्रतिनिधींनी प्रश्न विचारला. यावर बोलताना अजित पवार यांनी सूचक प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की, ‘घरातील कार्यक्रम असेल तर आम्ही एकत्र येतोच.’दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार का? भविष्यात काही वेगळं चित्र दिसेल का? असं अजित पवार यांना विचारलं असता ते म्हणाले की, “माझ्या मुलाच्या साखरपुड्याला ते सर्वजण (शरद पवार, सुप्रिया सुळे) आले होते. घरातील कार्यक्रम असतील तर आम्ही जातोच, एकत्र येतोच. आमची विचारधारा वेगवेगळी जरी असली तरी बाकीच्या बाबतीत कुटुंब म्हणून जिथे कुठे सुख आणि दु:खामध्ये आपण नेहमी एकमेकांच्या बरोबर असतो”, असं अजित पवार यांनी म्हटलं आहे.गेल्या काही दिवसांपासून दोन्ही राष्ट्रवादी (शरद पवार यांची राष्ट्रवादी आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी) काँग्रेस पक्ष एकत्र येणार असल्याच्या चर्चा सुरु आहेत. याबाबत ३१ मे रोजी पत्रकारांनी शरद पवार यांना प्रश्न विचारला असता शरद पवार यांनी फक्त तीन शब्दांत प्रतिक्रिया दिली होती. ते म्हणाले होते की, “मला माहिती नाही.”उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार हे रविवारी पुण्यातील साखर संकुल या ठिकाणी एका बैठकीत एकत्र आले होते. यावेळी दोघांमध्ये काही वेळ संवाद देखील झाल्याचं बोललं जातं. तसेच सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार शरद पवार, अजित पवार आणि जयंत पाटील यांच्यात बंद दारांच्या आड चर्चा झाल्याचं बोललं जात आहे. मात्र, याबाबत अजित पवार किंवा शरद पवार यांच्याकडून कोणतीही प्रतिक्रिया समोर आली नव्हती.दरम्यान, या पार्श्वभूमीवर आता खुद्द अजित पवार यांनीच दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार का? यावर प्रतिक्रिया दिली आहे.

गेल्या काही दिवसांपासून दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याच्या चर्चांच्या संदर्भात अजित पवार यांना माध्यमांच्या प्रतिनिधींनी प्रश्न विचारला. यावर बोलताना अजित पवार यांनी सूचक प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की, ‘घरातील कार्यक्रम असेल तर आम्ही एकत्र येतोच.’असं अजित पवार यांना विचारलं असता ते म्हणाले की, “माझ्या मुलाच्या साखरपुड्याला ते सर्वजण (शरद पवार, सुप्रिया सुळे) आले होते.

### अजित पवार काय म्हणाले?

घरातील कार्यक्रम असतील तर आम्ही जातोच, एकत्र येतोच. आमची विचारधारा वेगवेगळी जरी असली तरी बाकीच्या बाबतीत कुटुंब म्हणून जिथे कुठे सुख आणि दु:खामध्ये आपण नेहमी एकमेकांच्या बरोबर असतो”, असं अजित पवार यांनी म्हटलं आहे.गेल्या काही दिवसांपासून दोन्ही राष्ट्रवादी (शरद पवार यांची राष्ट्रवादी आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी) काँग्रेस पक्ष एकत्र येणार असल्याच्या चर्चा सुरु आहेत. याबाबत ३१ मे रोजी पत्रकारांनी शरद पवार यांना प्रश्न विचारला असता शरद पवार यांनी फक्त तीन शब्दांत प्रतिक्रिया दिली होती. ते म्हणाले होते की, “मला माहिती नाही.”उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार हे रविवारी पुण्यातील साखर संकुल या ठिकाणी एका बैठकीत एकत्र आले.

# “त्यांचं बोलणं बालिशपणाचं”!

## बाळासाहेब थोरातांनी आमदार सत्यजित तांबेंना सुनावलं

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते तथा माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी आमदार सत्यजित तांबे यांना चांगलंच सुनावलं आहे. आमदार सत्यजित तांबे यांनी काही दिवसांपूर्वी एका मुलाखतीत बोलताना लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधींसह काँग्रेस पक्षावर जोरदार टीका केली होती. यावरून महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी देखील सत्यजित तांबे यांना प्रत्युत्तर दिलं होतं.**



दरम्यान, त्यानंतर आता बाळासाहेब थोरात यांनी आमदार सत्यजित तांबे यांनी राहुल गांधींबाबत केलेल्या विधानावरून त्यांना चांगलंच सुनावलं आहे. सत्यजित तांबे यांचं बोलणं बालिशपणाचं असल्याचं थोरातांनी म्हटलं आहे.आमदार सत्यजित तांबे हे राहुल गांधी आणि काँग्रेसबाबत बोलले हे खरं आहे. आता ते (सत्यजित तांबे) आमदार आहेत. त्यामुळे मला यामध्ये दोन गोष्टी बोलाव्या लागतील. आपल्या जीवनात ज्यांनी कोणी काही केलेलं असेल तर त्यांचे ऋण तुम्ही कायम लक्षात ठेवले पाहिजेत. काँग्रेस पक्षाचं योगदान सत्यजित तांबे यांच्यासाठी खूप महत्वाचं राहिलेलं आहे.

तसेच या निमित्ताने मी आणखी एक सांगेल की आमदार सत्यजित तांबे यांचं जे बोलणं आहे ते बालिशपणाचं आहे. त्यामुळे त्यांना आणखी काही गोष्टी शिकाव्या लागतील”, असं बाळासाहेब थोरात यांनी म्हटलं आहे.काही गोष्टी मांडायला हरकत नाही. पण तुम्ही आता स्वतंत्र झाले, तुमचं युवक काँग्रेसच्या पदाच्या पुढंच वय गेलं. त्यामुळे आता कोणती मांडणी कुठे करावी आणि कोणती नाही? हे शिकलं पाहिजे. आपल्या जीवनात ज्यांनी कोणी काही दिलेलं असेल त्यांचे ऋण माणसांनी कायम लक्षात ठेवले पाहिजेत. अंतकरणात तरी ऋण ठेवले पाहिजेत. त्यामुळे त्यांनी स्वत:च आत्मचिंतन करण्याची जास्त गरज आहे”, असं बाळासाहेब थोरात यांनी म्हटलं आहे.दरम्यान, सत्यजित तांबे यांनी एका मुलाखतीत बोलताना महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाच्या नेत्यांना थेट आव्हान दिलं होतं.

### सत्यजित तांबे काय म्हणाले होते?

सत्यजित तांबे यांचं बोलणं बालिशपणाचं असल्याचं थोरातांनी म्हटलं आहे.आमदार सत्यजित तांबे हे राहुल गांधी आणि काँग्रेसबाबत बोलले हे खरं आहे. आता ते (सत्यजित तांबे) आमदार आहेत. त्यामुळे मला यामध्ये दोन गोष्टी बोलाव्या लागतील. आपल्या जीवनात ज्यांनी कोणी काही केलेलं असेल तर त्यांचे ऋण तुम्ही कायम लक्षात ठेवले पाहिजेत. काँग्रेस पक्षाचं योगदान सत्यजित तांबे यांच्यासाठी खूप महत्वाचं राहिलेलं आहे. तसेच या निमित्ताने मी आणखी एक सांगेल की आमदार सत्यजित तांबे यांचं जे बोलणं आहे ते बालिशपणाचं आहे. त्यामुळे त्यांना आणखी काही गोष्टी शिकाव्या लागतील”, असं बाळासाहेब थोरात यांनी म्हटलं आहे.काही गोष्टी मांडायला हरकत नाही. पण तुम्ही आता स्वतंत्र झाले, तुमचं युवक काँग्रेसच्या पदाच्या पुढंच वय गेलं. त्यामुळे आता कोणती मांडणी कुठे करावी आणि कोणती नाही? हे शिकलं पाहिजे.

# मोबाइलवर सरकारचं नियंत्रण!

## दर पाच मिनिटांनी स्क्रिनशॉट, काय आहे डिजिटल हुकूमशाही?

| नवी दिल्ली |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**उत्तर कोरियामधील हुकूमशाह किम जोंग उन यांच्या करामती अनेकदा जगासमोर येत असतात. आताही किम जोंग उनचा असाच एक कारनामा बीबीसी वृत्तसमूहाने समोर आणला आहे. उत्तर कोरियामधील जनतेचे स्मार्टफोन आता सरकारद्वारे नियंत्रित करण्यात येत असल्याचे बीबीसीने पुराव्यासह दाखवले आहे. यामुळे लोकांना देशाबाहेरील कोणतीही माहिती प्राप्त करता येत नाही किंवा स्वतःच्या स्मार्टफोनचा खासगी वापर करता येत नाही.**




२०२४ च्या अखेरीस बीबीसीने तस्करीद्वारे उत्तर कोरियातील स्मार्टफोन मिळवून त्याची तपासणी केली. या स्मार्टफोनमध्ये अँड्रॉईडचे बदल केलेले व्हर्जन वापरले जाते. ज्याद्वारे फक्त स्थानिक इंटरनेटच फोनला जोडले जाऊ शकते. या इंटरनेटच्या माध्यमातून उत्तर कोरियाच्या सरकारला जी माहिती दाखवायची आहे, तीच वापरकर्त्याला पुरविली जाते.एवढेच नाही तर एखाद्याला फोनवर काही संदेश टाइप करायचा असेल तर सरकारला जी भाषा अपेक्षित आहे, ती आपोआप उमटली जाते. उदाहरणार्थ, एखाद्याने स्मार्टफोनवर दक्षिण कोरिया हा शब्द टाइप केल्यास तो आपोआप 'पपेट स्टेट' (कळसूत्री बाहुली देश) असा होतो. उत्तर कोरिया सरकारने अधिकृतपणे शेजारच्या राष्ट्राला हा शब्द दिला आहे. तसेच फोनवर "ओप्पा" असा शब्द टाइप केल्यास फोनवर सावधानतेची सूचना दिली जाते. हा शब्द फक्त भाऊ-बहिणच एकमेकांसाठी वापरू शकतात, अशी सूचना आल्यानंतर सदर शब्द 'कॉम्रेड' शब्दात बदलतो. ओप्पा हा शब्द दक्षिण कोरियात प्रामुख्याने मोठा भाऊ किंवा प्रियकरासाठी वापरला जातो.सदर स्मार्टफोनचे विश्लेषण करताना आणखी एक धक्कादायक बाब समोर आली. ती म्हणजे, या स्मार्टफोनद्वारे गुप्तपणे दर पाच मिनिटांनी स्क्रिनशॉट घेतला जातो. हे स्क्रिनशॉट एका गुप्त फोल्डरमध्ये जतन केल्या जातात. फोनच्या वापरकर्त्याला त्या दिसत नाहीत मात्र सरकारी यंत्रणा त्या पाहू शकतात. जर स्मार्टफोनशी छेडछाड झाली किंवा जर बाहेरच्या देशातील माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला तर तो गुन्हा मानला जाईल.उत्तर कोरियाचे सरकार त्यांचा राजकीय अजेंडा रेटण्यासाठी आणि लोकांच्या संवादावर नियंत्रण ठेवण्यासाठी कशाप्रकारे तंत्रज्ञानाचा वापर करत आहे, यावर बीबीसीच्या अहवालात प्रकाश टाकण्यात आला आहे. अहवालात एका तंत्रज्ञान विश्लेषकाने नमूद केले की, यातून फक्त इंटरनेटच ब्लॉक केले असे नाही तर लोकांच्या विचार करण्याच्या आणि व्यक्त होण्याच्या पद्धतीवरही अंकुश आणला आहे.१९५३ मध्ये कोरियन युद्ध संपल्यानंतर उत्तर कोरिया आणि दक्षिण कोरियाने कोणताही शांतता करार न करता शत्रुत्व कायम ठेवले. यातूनच एकमेकांवर कुरघोडी करण्यासाठी अशा क्लुप्त्यांचा वापर केला जातो. २०२४ च्या अखेरीस बीबीसीने तस्करीद्वारे उत्तर कोरियातील स्मार्टफोन मिळवून त्याची तपासणी केली. या स्मार्टफोनमध्ये बदल केलेले व्हर्जन वापरले जाते.

### फोनवर सावधानतेची सूचना

ज्याद्वारे फक्त स्थानिक इंटरनेटच फोनला जोडले जाऊ शकते. या इंटरनेटच्या माध्यमातून उत्तर कोरियाच्या सरकारला जी माहिती दाखवायची आहे, तीच वापरकर्त्याला पुरविली जाते.एवढेच नाही तर एखाद्याला फोनवर काही संदेश टाइप करायचा असेल तर सरकारला जी भाषा अपेक्षित आहे, ती आपोआप उमटली जाते. उदाहरणार्थ, एखाद्याने स्मार्टफोनवर दक्षिण कोरिया हा शब्द टाइप केल्यास तो आपोआप 'पपेट स्टेट' (कळसूत्री बाहुली देश) असा होतो. उत्तर कोरिया सरकारने अधिकृतपणे शेजारच्या राष्ट्राला हा शब्द दिला आहे. तसेच फोनवर "ओप्पा" असा शब्द टाइप केल्यास फोनवर सावधानतेची सूचना दिली जाते.

# 'बकऱ्याच्या आकाराचा केक कापा'

## बकरी ईदच्या आधी भाजपाची मागणी; पोलिसांना लिहिले पत्र

| नवी दिल्ली |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**भाजपाचे आमदार नंद किशोर गुर्जर यांनी पोलीस उपायुक्तांना फोन करून एक अजब मागणी केली आहे. बकरी ईदच्या आधी हिंडन एअरपोर्टच्या आसपास असलेल्या परिसरातील मटणाची दुकाने आणि कत्तलखाने बंद ठेवण्याची मागणी केली आहे. लोन विधानसभेचे आमदार नंद किशोर गुर्जर यांनी मागणी केली की, लोनी प्रशासनाने एअरक्राफ्ट परिसरात पशुधन कायद्याची अंमलबजावणी करत गोवंश किंवा इतर कोणत्याही प्राण्याचा बळी दिला जाणार नाही, याची खातरजमा करावी.**



भाजपा आमदार गुर्जर यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर एक व्हिडीओ आणि पत्रही शेअर केले आहे. ज्यामध्ये त्यांनी लिहिले की, लोनी परिसर हा हवाई उड्डाणाच्या क्षेत्रात येतो. यासाठी उड्डाणाच्या क्षेत्रातील १० किमी अंतरावर एकही कत्तलखाना किंवा मांसाचे दुकान आणि मांसाहारी हॉटेल असता कामा नये. कत्तलखान्यात प्राण्यांचे रक्त वाहते, त्यामुळे पक्षी आकर्षित होतात.पक्षी आल्यामुळे याआधीही इकडे एक विमान कोसळल्याची घटना घडली होती. यासाठी या परिसरातील कत्तलखाने बंद करायला हवेत. नंद किशोर गुर्जर यांनी पुढे म्हटले की, एअरफोर्स परिसरात जर बकरी ईदच्या दिवशी बेकायदेशीर कत्तली करण्यात आला तर हे प्रकरण राष्ट्रद्रोहाशी जोडले जाईल. मागच्या वर्षी मुस्लीम बांधवांनी इको फ्रेंडली ईद साजरी केली होती. त्यांनी बकऱ्याच्या आकाराचा केक बनवून कापला होता. मला आशा आहे की, यावर्षीही ते असेच करतील. मात्र तरी काही लोकांनी जर जाणुनबुजून बकरे कापण्याचा प्रयत्न केला तर पोलिसांना माझे आवाहन आहे की, त्यांनी कडक कारवाई करावी.बागेश्वर धामचे प्रमुख धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांनीही बकरी ईदला होणाऱ्या कत्तलीचा विरोध केला आहे. ते म्हणाले, "मुक्या प्राण्यांची हिंसा कोणत्याही समाज, जनावरांचा बळी देणाऱ्या बकरी ईद सारख्या सणांचे आम्ही समर्थन करत नाहीत.

### धीरेंद्र शास्त्री काय म्हणाले?

जर आपण कुणाचे प्राण वाचवू शकत नसू, तर प्राण घेण्याचेही अधिकार आपल्याला नाहीत."भाजपा आमदार गुर्जर यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर एक व्हिडीओ आणि पत्रही शेअर केले आहे. ज्यामध्ये त्यांनी लिहिले की, लोनी परिसर हा हवाई उड्डाणाच्या क्षेत्रात येतो. यासाठी उड्डाणाच्या क्षेत्रातील १० किमी अंतरावर एकही कत्तलखाना किंवा मांसाचे दुकान आणि मांसाहारी हॉटेल असता कामा नये. कत्तलखान्यात प्राण्यांचे रक्त वाहते, त्यामुळे पक्षी आकर्षित होतात. पक्षी आल्यामुळे याआधीही इकडे एक विमान कोसळल्याची घटना घडली होतीनंद किशोर गुर्जर यांनी पुढे म्हटले की, एअरफोर्स परिसरात जर बकरी ईदच्या दिवशी बेकायदेशीर कत्तली करण्यात आला तर हे प्रकरण राष्ट्रद्रोहाशी जोडले जाईल.

# माझी आई माझे पैसे



बॉलीवूड अभिनेत्री सारा अली खान ही तिच्या चित्रपटांमुळे चर्चेत असते. अभिनेत्री नुकतीच 'स्काय फोर्स' या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आली होती. स्काय फोर्समधील तिच्या भूमिकेचे मोठे कौतुकदेखील होताना दिसले.बॉलीवूड अभिनेत्री सारा अली खान ही तिच्या चित्रपटांमुळे चर्चेत असते. अभिनेत्री नुकतीच 'स्काय फोर्स' या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आली होती. स्काय फोर्समधील तिच्या भूमिकेचे मोठे कौतुकदेखील होताना दिसले.सारा अली खानने नुकताच टाइम्स नाऊ समिट २०२५ मध्ये हजेरी लावली होती. यावेळी आर्थिक गुंतवणूकीबाबत सारा अली खान म्हणाली, "माझी आई माझे पैसे हाताळते. अगदी माझे जी पे(GPAY) अकाउंटदेखील तिच्या अकाउंटबरोबर जोडलेले आहे, माझा ओटीपी नंबर तिच्या मोबाईलवर येतात."शाळेत असताना जसा इतरांना पॉकेट मनी मिळतो. तसा तुला आता पॉकटे मनी मिळतो का? यावर सारा म्हणाली, "पॉकेट मनी विसरा, मी तिला विचारल्याशिवाय तिकीटदेखील बुक करू शकत नाही." पुढे ती आर्थिक कुठे गुंतवणूक करते असे विचारले असता अभिनेत्री म्हणाली, "रिअल इस्टेट, शेअर बाजार, सोन्याचे बाँडमध्ये गुंतवणूक करत असल्याचा खुलासा केला. सारा अली खान अमृता सिंग व सैफ अली खान यांची मुलगी आहे. सैफ अली खान व अमृता सिंगने १९९१ मध्ये लग्नगाठ बांधली होती. मात्र, २००४ मध्ये त्यांनी वेगळे होण्याचा निर्णय घेतला. त्यांना सारासह इब्राहिम अली खान हा मुलगादेखील आहे. त्यानंतर सैफ अली खानने करीना कपूरशी २०१२ मध्ये लग्नगाठ बांधली. त्यांना तैमूर व जेह ही मुले आहेत. सैफने दुसरे लग्न केले असले तरी त्याचे सारा व इब्राहिमबरोबर उत्तम नाते असल्याचे पाहायला मिळते. अनेक सण-उत्सव ते एकत्र साजरे करतात. सारा, इब्राहिम, जेह व तैमूर यांच्यातील बॉण्डिंगदेखील लक्ष वेधून घेताना दिसते.जानेवारी महिन्यात सैफ अली खानवर एका अज्ञात व्यक्तीने घरात घुसून चाकू हल्ला केला होता. त्यावेळी हे कुटुंब मोठ्या चर्चेत आले होते. करीना कपूर, शर्मीला टागोर यांच्यासह सारा-इब्राहिमदेखील चिंतेत असल्याचे दिसले होते. आता हे कुटुंब त्यांच्या सुरक्षेची काळजी घेताना दिसते. बॉलीवूड अभिनेत्री सारा अली खान ही तिच्या चित्रपटांमुळे चर्चेत असते. अभिनेत्री नुकतीच 'स्काय फोर्स' या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आली होती. स्काय फोर्समधील तिच्या भूमिकेचे मोठे कौतुकदेखील होताना दिसले. बॉलीवूड अभिनेत्री सारा अली खान ही तिच्या चित्रपटांमुळे चर्चेत असते. अभिनेत्री नुकतीच 'स्काय फोर्स' या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आली होती. स्काय फोर्समधील तिच्या भूमिकेचे मोठे कौतुकदेखील होताना दिसले.

# आमिषाचा खुलासा



सध्या मनोरंजन विश्वात दोन सिनेमे धुमाकूळ घातला आहे. त्यात एक आहे 'गदर2' आणि दुसरा आहे 'OMG2'. गदर2 च्या माध्यमातुन सनी देओल आणि आमिषा पटेल यांनी बऱ्याच वर्षांनंतर मोठ्या पडद्यावर एंट्री केली आहे. दोघांची जोडी देखील प्रेक्षकांना खुप आवडत आहे. दरम्यान अमिषाने या चित्रपटाला मिळालेल्या यशानंतर अनेक मुलाखती दिल्या आहेत. याच एका मुलाखतीत तिने तिच्या फ्लॉप चित्रपटाबाबत सलमान खानला जबाबदार धरले आहे. तब्बल दोन दशकांनंतर आमिषाचा गदर 2 चित्रपट ब्लॉकबस्टर ठरला आहे. अमीषाने तिच्या करिअरच्या सुरुवातीला दोन सुपरहिट चित्रपट दिले, पण नंतर तिच्यावर फ्लॉप चित्रपटांचा शिक्का लागला. दरम्यान ती एका मुलाखतीत तिच्या 2002 मध्ये प्रदर्शित झालेल्या तिच्या 'ये है जलवा' या फ्लॉप चित्रपटाबद्दल बोलली. या चित्रपटात तिच्या सोबत बॉलिवूडचा सुपरस्टार सलमान खान हा मुख्य भूमिकेत होता. या चित्रपटाची स्टोरी जरी चांगली असली तरी हा सिनेमा काही खास कमाल करु शकला नाही. याबद्दल बोलतांना अमीषा पटेल म्हणाली की, डेव्हिड धवनच्या दिग्दर्शनात झालेल्या या चित्रपटात सर्व काही हिट झालं होतं मात्र त्यावेळी सलमान खानच्या 'हिट-अँड-रन' प्रकरणाच्या मीडिया कव्हरेजने या चित्रपटाच्या कामगिरीवर वाईट परिणाम झाला आणि चित्रपट खराब झाला. अमीषा म्हणते, "ये है जलवा हा डेव्हिड धवनच्या सर्वोत्कृष्ट चित्रपटांपैकी एक होता. सलमान खुपच देखणा दिसत होता. चित्रपटाचे संगीत आणि सर्व काही चांगले होते.

# अक्षय -रवीनाची जोडी एकत्र?

बॉलिवूडचा खिलाडी कुमार म्हणजेच अक्षय कुमार हा सध्या त्याच्या OMG2 या चित्रपटामुळे चर्चेत आहे. त्याचा हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करत आहेत. अक्षयच्या गेल्या काही चित्रपटांकडे पाहिलं तर त्याचे सलग सहा चित्रपट बॉक्स ऑफिसवर फ्लॉप झाले होते मात्र OMG2 ने आता अक्षयच्या फ्लॉप सिनेमांवर फुल स्टॉप लावला आहे. सध्या अक्षय कुमार त्याच्या सिनेमातील अभिनेत्रीच्या नावामुळे चर्चेत असते. आता अक्षयच्या पुढच्या चित्रपटात त्याची एक्स गर्लफ्रेंड रवीना टंडन सोबत दिसणार असल्याचं बोललं जात आहे. बॉलिवूडमध्ये असा एक काळ होता ज्यावेळी अक्षय कुमार आणि रवीना टंडन यांची जोडी बॉक्स ऑफिसवर सुपरहिट होती. अनेक सिनेमांमध्ये त्यांनी एकत्र काम केले होते. ही जोडी बॉलिवूडमधील सर्वात हिट जोडीपैकी एक आहे. यासोबतच दोघांनीही एकमेकांना बराच काळ डेट केले होते. मात्र काही काळानंतर दोघेही वेगळे झाले. त्याचे प्रेम प्रकरण आणि ब्रेकअप आणि नंतर दुसऱ्याशी लग्न झाल्यानंतर दोघांची जोडी पुन्हा मोठ्या पडद्यावर पाहायला मिळाली नाही. त्याचे चाहते या जोडीला खुप मिस करत होते. त्यांना एकत्र पाहण्यासाठी चाहते अजूनही उत्सुक आहेत. आता तब्बल 19 वर्षांनंतर पुन्हा एकदा ही जोडी प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याच्या बातम्या समोर आल्या आहेत. मीडियाने दिलेल्या वृत्तानुसार, अक्षय कुमार आणि रवीना टंडन आता 'वेलकम 3'मध्ये एकत्र काम करणार आहेत. 'वेलकम टू द जंगल'मध्ये ही जोडी प्रेक्षकांचे मनोरंजन करणार आहेत.




# त्या व्हिडिओनं नेटकरी हँग!



उर्फी जावेद ही नेहमीच तिच्या वेगवेगळ्या अतरंगी फॅशनमुळे चर्चेत असणारी सेलिब्रेटी आहे. त्यावरुन उर्फीला अनेकांनी साम, दाम, दंड आणि भेद याप्रकारे समजावण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याचा तिच्यावर काहीही परिणाम झालेला नाही. आता उर्फीच्या हटके फॅशनचा एक व्हिडिओ समोर आला आहे. त्यात तिनं जी वेशभूषा केली आहे त्यावरुन तिच्या चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. अनेकांनी उर्फीवर नेहमीप्रमाणे जोरदार टीका केली आहे. काहींनी तर उर्फीच्या हटके स्टाईलवर कौतुकाचा वर्षाव केला आहे. एवढी भारी आयडिया उर्फीला सुचते तरी कशी, असा प्रश्न तिला नेटकऱ्यांनी विचारला आहे. यापूर्वी उर्फीनं वेगवेगळ्या वस्तूंचा वापर करुन तिची फॅशनची हौस पूर्ण केली आहे. घरातील ग्लास, भांडी, मोबाईल फोन आणि चक्क कंगव्याचा ड्रेस उर्फीनं परिधान करुन आपण किती क्रिएटिव्ह आहोत याचा परिचय करुन दिला आहे. तिचा तो अंदाज सोशल मीडियावर नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेताना दिसत आहे. उर्फीनं तो व्हिडिओ शेयर केल्यानंतर त्यावर आलेल्या प्रतिक्रिया भन्नाट आहेत. एकानं लिहिलं आहे की, मी घरातील माझा कंगवा शोधत होतो. जेव्हा उर्फीचा व्हिडिओ पाहिला तेव्हा मात्र मला धक्काच बसला. उर्फी माझा कंगवा घेऊन गेली. आता काय बोलावं. दुसऱ्या युझर्सनं म्हटले की, उर्फी घरात तर पूर्ण कपड्यात असते. घराबाहेर पडल्यावर ती अशी का वागते हे कळत नाही. तिसऱ्या युझर्सनं लिहिलं आहे, बस किंवा ट्रेनमध्ये काहीजण कंगवा विकण्यासाठी येतात हे आम्हाला माहिती होतं. पण आता उर्फी देखील हा नवा बिझनेस करु लागली आहे की काय, असा प्रश्न तिचा तो व्हिडिओ पाहिल्यावर पडतो. एवढी कल्पनाशक्ती येते कुठून, असे प्रश्न तिला नेटकऱ्यांनी विचारले आहेत.

# शो संपताच श्रेयस तळपदे भावुक

झी मराठीवरील लोकप्रिय रिॲलिटी शो 'चल भावा सिटीत'चा महाअंतिम सोहळा रविवारी (१ जून) रोजी दिमाखात पार पडला. या पहिल्या पर्वाच्या अंतिम फेरीत पाच जोड्यांमध्ये चुरशीच्या लढत रंगली होती. शोच्या अंतिम सोहळ्यात अथर्व-रेवती, विजय-अनुश्री, ऋषिकेश-श्रुती, दिपक-प्रणाली आणि रामा-नीता या पाच जोड्या पोहोचल्या होत्या. यापैकी श्रुती राऊळ आणि ऋषिकेश चव्हाण या जोडीने बाजी मारली. या शोच्या निमित्ताने बॉलीवूडसह मराठी मनोरंजन विश्वात आपल्या अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकणारा अभिनेता श्रेयस तळपदे छोट्या पडद्यावर पुन्हा एकदा आपली



जादू दाखवली. 'चल भावा सिटीत' या रिॲलिटी शोच्या सूत्रसंचालनाची जबाबदारी श्रेयसवर होती आणि त्याने ही जबाबदारी अगदी चोखपणे पार पाडली. श्रेयसने आधी झी मराठीवरीलच 'माझी तुझी रेशीमगाठ' मालिकेतून प्रेक्षकांचं मनोरंजन केलं होतं.चल भावा सिटीत' शोची सांगता होताच श्रेयसने सोशल मीडियावर त्याच्या भावना व्यक्त केल्या आहेत. खास व्हिडीओ शेअर करत श्रेयस असं म्हणतो, "मित्रांनो अशाप्रकारे आपल्या 'चल भावा सिटीत'ची सांगता होत आहे. ज्या प्रेक्षकांनी भरभरून प्रेम दिले, उत्कृष्ट प्रतिसाद दिला, न चुकता शो पाहिला. त्यांचे मी सर्व प्रथम आभार मानतो. तुमच्या प्रेमामुळे, पाठिंब्याने आम्हाला उत्तम काम करण्याची स्फूर्ती येते."

# आयपीएल फायनलवर पावसाचं सावट!

## सामना रद्द झाल्यास पंजाब की आरसीबी, कोण होणार चॅम्पियन?

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज।

**इंग्लंडचा संघ वेस्ट इंडिजविरूद्ध तीन सामन्यांची वनडे मालिका खेळत आहे. या मालिकेतील सलग दोन सामने जिंकत इंग्लंडने वेस्ट इंडिजविरूद्धची मालिका २-० ने जिंकली. दुसऱ्या सामन्यात १६६ धावा करत जो रूट सामन्याचा हिरो ठरला. तर दोन्ही सामन्यांमध्ये मुंबई इंडियन्स आणि आरसीबी संघातील खेळाडूंनी मोठं योगदान दिलं आहेआयपीएल २०२५ स्पर्धेतील अंतिम सामना पंजाब किंग्ज आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू या दोन्ही संघांमध्ये रंगणार आहे. हा सामना ३ जूनला अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर रंगणार आहे. या सामन्याआधी क्रिकेट चाहत्यांचं टेन्शन वाढवणारी बातमी समोर येत आहे. या सामन्यावर पावसाचं सावट आहे.**




त्यामुळे सामना रद्दही होऊ शकतो. असं झाल्यास कोणता संघ आयपीएल २०२५ स्पर्धेच्या जेतेपदाचा मानकरी ठरणार? जाणून घ्या..पंजाब किंग्ज संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी श्रेयस अय्यरकडे आहे. तर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी रजत पाटीदारकडे आहे. दोन्ही संघ आपल्या पहिल्या जेतेपदाच्या प्रतिक्षेत आहेत. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने क्वालिफायर १ मध्ये पंजाब किंग्जला पराभूत करून अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. तर दुसरीकडे पंजाब किंग्जने क्वालिफायर २ मध्ये मुंबई इंडियन्स संघाला पराभूत करत अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. क्वालिफायर २ चा सामना देखील याच मैदानावर पार पडला. या सामन्यात देखील पावसाने हजेरी लावली होती. त्यामुळे ७:३० ला सुरू होणारा सामना ९:४५ ला सुरू झाला. बीसीसीआयने सामना सुरू करण्यासाठी अतिरिक्त १२० मिनिटं दिली आहेत.

त्यामुळे सामन्यावेळी पाऊस पडला, तर १२० मिनिटांपर्यंत सामना सुरू झाल्यास एकही षटक कमी न करता २०-२० षटकांचा सामना खेळवता येऊ शकतो. १२० मिनिटे झाल्यानंतर षटकं कमी करायला सुरूवात होईल. पण जर पाऊस थांबलाच नाही, तर सामना दुसऱ्या दिवशी म्हणजे, ४ जूनला खेळवला जाऊ शकतो.बीसीसीआयकडून प्लेऑफच्या सामन्यांसाठी राखीव दिवस ठेवण्यात आला नव्हता. पण, अंतिम सामन्यासाठी राखीव दिवस ठेवण्यात आला आहे. मात्र, यादिवशीही सामना होऊ शकला नाहीतर मग साखळी फेरीतील सामन्यांमध्ये गुणतालिकेत अव्वल स्थानी असलेल्या संघाला विजेता घोषित केले जाऊ शकते. बीसीसीआयकडून प्लेऑफच्या सामन्यांसाठी राखीव दिवस ठेवण्यात आला नव्हता. पण, अंतिम सामन्यासाठी राखीव दिवस ठेवण्यात आला आहे. मात्र, यादिवशीही सामना होऊ शकला नाहीतर मग साखळी फेरीतील सामन्यांमध्ये गुणतालिकेत अव्वल स्थानी असलेल्या संघाला विजेता घोषित केले जाऊ शकते. सामना रद्दही होऊ शकतो. असं झाल्यास कोणता संघ आयपीएल २०२५ स्पर्धेच्या जेतेपदाचा मानकरी ठरणार? जाणून घ्या..पंजाब किंग्ज संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी श्रेयस अय्यरकडे आहे. तर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी रजत पाटीदारकडे आहे. दोन्ही संघ आपल्या पहिल्या जेतेपदाच्या प्रतिक्षेत आहेत. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने क्वालिफायर १ मध्ये पंजाब किंग्जला पराभूत करून अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. मुंबई इंडियन्स संघाला पराभूत करत अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. क्वालिफायर २ चा सामना देखील याच मैदानावर पार पडला. या सामन्यात देखील पावसाने हजेरी लावली होती.

### राखीव दिवस ठेवण्यात आला नव्हता

त्यामुळे ७:३० ला सुरू होणारा सामना ९:४५ ला सुरू झाला. बीसीसीआयने सामना सुरू करण्यासाठी अतिरिक्त १२० मिनिटं दिली आहेत. त्यामुळे सामन्यावेळी पाऊस पडला, तर १२० मिनिटांपर्यंत सामना सुरू झाल्यास एकही षटक कमी न करता २०-२० षटकांचा सामना खेळवता येऊ शकतो. १२० मिनिटे झाल्यानंतर षटकं कमी करायला सुरूवात होईल. पण जर पाऊस थांबलाच नाही, तर सामना दुसऱ्या दिवशी म्हणजे, ४ जूनला खेळवला जाऊ शकतो.बीसीसीआयकडून प्लेऑफच्या सामन्यांसाठी राखीव दिवस ठेवण्यात आला नव्हता. पण, अंतिम सामन्यासाठी राखीव दिवस ठेवण्यात आला आहे. मात्र, यादिवशीही सामना होऊ शकला नाहीतर मग साखळी फेरीतील सामन्यांमध्ये गुणतालिकेत अव्वल स्थानी असलेल्या संघाला विजेता घोषित केले जाऊ शकते.बीसीसीआयकडून प्लेऑफच्या सामन्यांसाठी राखीव दिवस ठेवण्यात आला नव्हता.

# ६०० कोटींची संपत्तीही नाकारली

## पंजाबची मालकीण प्रीती झिंटाला का मिळाला शौर्य पुरस्कार?

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज।

**'दिल से' या चित्रपटातून घराघरात पोहोचलेली प्रीती झिंटा आज आयपीएलमुळे चर्चेत आहे. तिच्या गालावरच्या खळीने तिने अनेकांना घायाळ केलंय. ऐश्वर्या राय, रानी मुखर्जी, प्रियांका चोप्रा, करीना कपूरसारख्या तिच्या समवयस्क अभिनेत्रींना तिने तिच्या उमेदीच्या काळात टफ फाईट दिली होती. आज ती यशस्वी अभिनेत्री, यशस्वी उद्योजिका म्हणून ओळखली जाते.**

शिमला येथील मुळची असलेल्या प्रीती झिंटावर वयाच्या १३ व्या वर्षी तिच्या वडिलांचं निधन झाल्याने संपूर्ण कुटुंबाची जबाबारी येऊन पडली. १९९८ मध्ये दिल से चित्रपटात तिने शाहरुख खानबरोबर तगडं काम करून तिने तिच्या अभिनयाची चुणूक दाखवली. त्यानंतर तिने कल हो ना हो, वीर झारा, लक्ष्य, सलाम नमस्ते, संघर्ष, कोई... मिल गया, क्या केहना, कभी अलविदा ना केहना,चोरी चोरी चुपके, चुपके, दि लास्ट लिअर, सोल्जर आदी अनेक चित्रपटात काम केलंय.

प्रीती झिंटाला तिच्या अभिनयामुळे खरी ओळख मिळाली असली तरीही तिची तेवढ्यापुरतीच ओळख मर्यादित नाही. तिने तिच्या आतापर्यंतच्या आयुष्यात असे अनेक निर्णय घेतलेत, ज्यामुळे



ती सतत चर्चेत राहिलीय. यामध्ये ६०० कोटी रुपयांची संपत्ती नाकारपण्यापासून थेट छोटा शकीलशी पंगा घेण्यापर्यंत सर्व गोष्टींचा समावेश आहे.चित्रपट निर्माते कमल अमरोही यांचा मुलगा शानदार अमरोही प्रीती झिंटाला मुलगी मानत होते. २०११ मध्ये शानदार अमरोही यांनी त्यांची ६०० कोटी रुपयांची संपत्ती त्यांच्या मृत्यूनंतर प्रीती झिंटाला देण्याची घोषणा केली होती. महत्त्वाचं म्हणजे त्यांना स्वतःची मुलं असूनही त्यांनी त्यांची संपत्ती प्रीती झिंटाच्या नावे करण्याचा निर्णय घेतला होता.

प्रीती झिंटा नेस वाडियाला डेट करत होती तेव्हा शानदार अमरोही प्रीती झिंटाला पहिल्यांदा भेटले होते. अमरोही यांचं त्यांच्या भावंडांबरोबर जेव्हा भांडण झालं होतं तेव्हा प्रीती त्यांच्या समर्थनार्थ उभी राहिली होती. तेव्हापासून यांच्यात चांगले संबंध निर्माण झाले.

शानदार अमरोही सतत तिला नवनवे गिफ्ट्स पाठवू लागले. त्यामुळे प्रीती त्यांच्या कुटुंबातील एक सदस्य बनली होती. तसंच, शानदार यांच्या निधनानंतर त्यांची संपूर्ण संपत्ती प्रीतीच्या नावे करण्याचीही शानदार यांनी तयारी दाखवली.

पण प्रीतीने ही संपत्ती नाकारली. एवढंच नव्हे तर शानदार अमरोहीच्या मृत्यूनंतर त्यांच्या मुलाविरोधात प्रीती झिंटने पोलीस तक्रारही केली होती. अमरोहीच्या उपचारांकरता प्रीतीने २ कोटींचं कर्ज दिलं होतं,

### छोटा शकीलशी पंगा

चोरी चोरी छुपके छुपके या चित्रपटाच्या वेळी थेट छोटा शकील याच्याशी पंगा घेतला होता. या चित्रपटात सलमान खान, राणी मुखर्जी होते. या चित्रपटाचे निर्माते भरत शाह यांना चित्रिकरणादरम्यान अटक झाली होती. कारण त्यांनी या चित्रपटासाठी छोटा शकीलकडून पैसे घेतल्याचा त्यांच्यावर आरोप आहे.

स्मार्ट PCMC
SMART CITY
# महाईन्यूज™
ePaper
। मंगळवार ।
। दि. 3 जून 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## वाय बी पाटील पॉलिटेक्निकलला ''एनबीए''कडून मान्यता

# वाय. बी. पाटील पॉलिटेक्निकल कॉलेजच्या शिरपेचात मानाचा तुरा!


## डिप्लोमा इन कॉम्प्युटर, इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग या दोन अभ्यासक्रमांना मान्यता

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**आकुर्डी येथील वाय. बी. पाटील पॉलिटेक्निकल कॉलेजच्या डिप्लोमा इन कॉम्प्युटर आणि इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग या दोन अभ्यासक्रमांना राष्ट्रीय मान्यता मंडळाकडून (एनबीए) मान्यता मिळाली आहे. यामुळे पिंपरी चिंचवड तसेच लगतच्या परिसरातील अनेक विद्यार्थ्यांना शहरातच दोन्ही अभ्यासक्रमांचे शिक्षण घेता येणार आहे. या मान्यतेमुळे वाय.बी. पाटील पॉलिटेक्निकल कॉलेजच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.**

एनबीए मान्यतेमुळे आकुर्डी येथील वाय.बी. पाटील पॉलिटेक्निकल संस्थेच्या शैक्षणिक कार्याची राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आल्याचे स्पष्ट झाले असल्याचे डी. वाय. पाटील आकुर्डी संकुलाचे डायरेक्टर रियर ॲडमिरल अमित विक्रम (निवृत्त), अध्यक्ष संजय डी. पाटील, सतेज पाटील, विश्वस्त तेजस पाटील, प्राचार्य डॉ. ए. एस. कोंडेकर यांनी म्हटले आहे.

एनबीएकडून डिप्लोमा इन कॉम्प्युटर इंजिनिअरिंग आणि डिप्लोमा इन इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग या दोन अभ्यासक्रमांना मान्यता म्हणजे वाय. बी. पॉलीटेक्निकल कॉलेजच्या प्रत्येक शिक्षकाचे आणि विद्यार्थ्यांचे कष्ट असून, या कष्टाचे हे यश आहे. या यशाने आम्हाला अधिक उंची गाठण्याची प्रेरणा मिळाली. असे मत संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले आहे. यातून विद्यार्थ्यांना यशाची नवी क्षितिजे गाठण्यासाठी मदत होणार आहे. असे संस्थेने म्हटले आहे.




“ वाय.बी. पॉलिटेक्निकल कॉलेज कॅम्पस हा गुणवत्ता, अत्याधुनिक जगाशी बरोबरी करण्यासाठी सर्व प्रकारची संसाधने आणि उच्च शिक्षण या त्रिसूत्री वर आधारित शिक्षणावर भर देत आहे.त्यामुळे गेल्या काही वर्षांमध्ये कॅम्पसने अनेक विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारच्या प्लेसमेंट देखील उपलब्ध करून दिल्या आहेत. गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या कसोटीवर खऱ्या अर्थाने उतरल्यामुळे राष्ट्रीय मान्यता मंडळाने कॉलेज कॅम्पसच्या गुणवत्तेची पोचपावती दिली आहे. आगामी काळात शिक्षणाच्या गुणवत्तेत सातत्याने सुधारणा करत अधिक मोठी उद्दिष्टे गाठण्यासाठी कॉलेज कॅम्पस सज्ज आहे.

-अमित विक्रम, (निवृत्त) डायरेक्टर, रियर ॲडमिरल वाय. बी. पॉलीटेक्निकल कॉलेज

## यमुनानगर-निगडीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

### सुलभा उबाळे यांचा विधायक उपक्रम; इयत्ता 10 वी, 12 वीतील यशस्वीतांना दिले प्रोत्साहन

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

दरवर्षी दहावी, बारावी बोर्डाच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवण्यासाठी शिवसेनेच्या माध्यमातून आम्ही हा कार्यक्रम घेतो. वर्षभर राबवल्या जाणाऱ्या अनेक कार्यक्रमांपैकी हा कार्यक्रम माझ्या अगदी जिव्हाळ्याचा आहे. कारण आपल्या पुढील पिढीचे, आपल्या समाजाचे भविष्य असलेल्या विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवण्याचे, त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्याचा मनस्वी आनंद या कार्यक्रमाच्या माध्यमातून मिळतो, अशा भावना शिवसेना उपनेत्या सुलभा उबाळे यांनी व्यक्त केल्या आहेत.



यमुनानगर, निगडी सेक्टर 22 येथील दहावी व बारावी बोर्डाच्या परीक्षेत 70 टक्क्यांहून अधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थी, विद्यार्थिनींचा गुणगौरव कार्यक्रम अपंग विद्यालय यमुनानगर निगडी येथे पार पडला. यामध्ये दहावी, बारावी परीक्षा पास झालेले अनेक गुणवंत विद्यार्थी, त्यांचे पालक तसेच परिसरातील नागरिक, शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी उबाळे बोलत होत्या.

कार्यक्रमाचे आयोजन युवासेना यमुनानगर शाखा यांच्या वतीने युवानेते अजिंक्य उबाळे यांनी संयोजन केले.

### या गुणवंतांचा केला गौरव

दहावीची गुणवतंत विद्यार्थी: कार्तिकी गणेश बनकर 98.40%, आर्या राजेश राव 97.00%, वरदा प्रदीप पिलवलकर 96.00%, संस्कार सुनील कदम 95.40%, शंतनु चंद्रशेखर नरवळे 95.20%, मधुरा प्रकाश कुलकर्णी 95.20%, समृद्धी अतुल पाटील 95.00%, सानिका गुरुदास पिसे 95.00%, बारावी गुणवंत विद्यार्थी: आदित्य उमेश देशपांडे 96.20%, सृष्टी प्रसन्न नहर 90.00%, सात्विक आशिष भाटिया 87.83% आदी.


EDUCATING MIND & HEART
Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of Excellence in Education
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic Empowering Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17k+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Swami Vivekanand Shikshan Prasarak Mandal's
GAYATRI GROUP OF SCHOOLS,
PUNE
ADMISSIONS OPEN
2025-26
PRE-PRIMARY
TO
HIGHER-SECONDARY
For more info
95277 64646 / 77967 67292



Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
Powered by
JAI HIND EDUTECH
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL
ADMISSION
OPEN
2025-2026
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
• Computer Science
• Crop Science
• Electronics
• Mechanical / Technical Automobile
• Information Technology (IT)
For Commerce Stream
• Banking
• Marketing & Sales
• Office Management
• Small Industries & Self employment
• Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241